(<u>इंग्रजीमध्ये  टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद</u>)

**२०२३  एस.सी.सी(SCC)  ऑनलाईन एस सी(SC) ४९७**

**भारताच्या सर्वोच्च न्यायालयात**

(न्यायमूर्ति सुधांशु धूलिया आणि न्यायमूर्ति जे बी पारदीवाला)

राकेश रमण ..... अपीलकर्ता

विरुद्ध

कविता ..... उत्तरवादी

दिवाणी अपील क्र.२०१२/२०१३

२६ एप्रिल  २०२३ रोजी न्यायनिर्णित करण्यात आले.

या प्रकरणात उपस्थित राहिलेले अधिवक्ता:-

अपीलकर्त्यांकरीता - श्री. अरविंद कुमार गुप्ता, ए. ओ. आर.(AOR)

श्री. सी. प्रकाश, अधिवक्ता

श्री. श्रेय तंवर, अधिवक्ता

उत्तरवादीकरीता  श्री. एस. आर. सेतिया, ए. ओ. आर.(AOR)

**न्यायमूर्ति सुधांशु धूलिया द्वारा** दिला गेलेला न्यायालयाचा निर्णय खालील प्रमाणे:-

अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश(उत्तर), तीस हजारी न्यायालय, दिल्ली यांच्या न्यायालयात हिंदू विवाह अधिनियम, १९५५ च्या कलम १३ अंतर्गत (यापुढे 'अधिनियम' म्हणून संदर्भित) अपीलकर्त्याने सुरू केलेल्या घटस्फोटाच्या कार्यवाहीतून हे अपील उद्भवते. त्याचा खटला निकाली काढण्यात आला आणि अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश (उत्तर) यांच्या दिनांक ०२.०५.२००९ रोजीच्या आदेशाद्वारे विवाह विघटित करण्यात आला. त्यानंतर

उत्तरवादी /पत्नीने दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली ज्यांनी न्यायचौकशी न्यायालयाचा आदेश रद्द  केला आणि पतीची याचिका फेटाळली. या आदेशामुळे व्यथित होऊन, अपीलकर्ता/पतीने या न्यायालयासमोर एस.एल.पि. (SLP)विशेष परवानगी याचिका दाखल केली होती, ज्यामध्ये २६.०२.२०१३ रोजी परवानगी  मंजूर करण्यात आली होती.

२. दिनांक १६.०४.१९९४ ला अपीलकर्ता आणि उत्तरवादी यांचे हिंदू विधी आणि रीतिरिवाजांनुसार दिल्लीयेथे लग्न झाले होते. दुर्दैवाने, त्यांच्या वैवाहिक जीवनात वैवाहिक कलह निर्माण होण्यास जास्त वेळ लागला नाही. अपीलकर्त्याचा खटला असा आहे की त्याची पत्नी त्यांच्या छोट्याशा घरात आनंदी नव्हती आणि ती त्याच्याविरुद्ध आक्षेपार्ह, अगदी अपमानास्पद भाषा वापरत होती. असा देखील आरोप करण्यात आला आहे की सप्टेंबर १९९४  मध्ये तिने तिच्या पतीला कोणतीही पूर्वसूचना न देता गर्भपात केला (हा आरोप पत्नीने नाकारला होता आणि तिच्याविरुद्ध कधीही सिद्ध होऊ शकला नाही). सप्टेंबर १९९४  मध्ये पुन्हा तिने तिचे दांपत्य निवास (सासरचे घर) सोडले, परंतु हितचिंतक आणि नातेवाईकांनी केलेल्या प्रयत्नांमुळे ते मार्च १९९५ पासून पुन्हा एकत्र राहू लागले. हे पुन्हा फार काळ टिकले नाही, कारण १६.०२.१९९८ ला तिने तिचे दांपत्य निवास (सासरचे घर) सोडले आणि १६/१७.०२.१९९८ ला स्थानिक पोलिसांकडे तक्रार दाखल केली. मार्च १९९८ मध्ये, अपीलकर्ता दुसरे निवासस्थान घेईल या अटीवर तिने आपल्या पतीसोबत जाण्यास सहमती दर्शवली आणि परिणामी एप्रिल १९९८ मध्ये दुसरे घर भाड्याने घेण्यात आले आणि ते दोघे नवीन घरात एकत्र राहू लागले. पण नंतर, २४.०८.१९९८ रोजी  अपीलकर्त्याने आरोप केला की त्याला त्याची पत्नी आणि तिच्या भावाने मारहाण केली. २९.११.१९९८ रोजी त्याला संपूर्ण रात्र त्याच्या स्वतःच्या घराबाहेर ठेवण्यात आले. १७.१२.१९९८ रोजी तिने तिचे दांपत्य निवास

(सासरचे घर) सोडले आणि अपीलकर्ता आणि त्याच्या भावाविरुद्ध दंड संहिता, १९६० च्या कलम ४९८अ /४०६ अंतर्गत आनंद पर्वत पोलिस स्टेशन, नवी दिल्ली येथे एफआयआर (FIR) दाखल केला. अपीलकर्ता आणि त्याच्या भावाला त्याच दिवशी अटक करण्यात आली, जेव्हा ते एका विवाह सोहळ्याला उपस्थित होते आणि हे त्याच्या १५ ते २० मित्रांच्या उपस्थितीत करण्यात आले. नंतर दोघांची जामिनावर सुटका करण्यात आली, मात्र पत्नीने हे प्रकरण मुद्दाम ताणले आणि त्यांचा जामीन रद्द करण्यासाठी अर्जही दाखल केला. त्यानंतर पत्नीने अपीलकर्ता/पती आणि त्याच्या कुटुंबातील सदस्यांविरुद्ध आयपीसी (IPC ) कलम ३४ सह कलम ३२३ आणि ३२४ अंतर्गत तक्रार दाखल केली, मात्र नंतर त्यांना या प्रकरणातून मुक्त करण्यात आले. उत्तरवादीने देखील फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५० सह कलम १०७ अंतर्गत अपीलकर्त्याविरुद्ध कारवाई सुरू केली. त्यानंतर तिने तिच्या निर्वाहसाठी हिंदू दत्तक आणि निर्वाह अधिनियम, १९५६ च्या कलम १८ अंतर्गत याचिका दाखल केली.

३. त्याच्या पत्नीने त्याला सोडून दिल्याने आणि त्याच्यावर अनेक खटल्यांचे ओझे लादल्याने, अपीलकर्त्याने वैवाहिक संबंध संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतला. अशा प्रकारे, इतर गोष्टींसह, आधीच्या परिच्छेदात वर्णन केलेल्यागोष्टींमुळे त्याने हिंदू विवाह अधिनियम, १९५५ च्या कलम १३ (१)(आय. ए.) (ia) आणि (आय. बी.)(ib) अंतर्गत विवाह विच्छेदासाठी याचिका अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश,उत्तर दिल्ली, यांच्या समोर दिनांक २०.०९.२००२ रोजी दाखल केली.

४. उत्तरवादी हे नाकारते की तिने कधीही आपल्या पतीला 'सोडून' दिले नाही किंवा त्याच्यावर कोणताही अत्याचार केला नाही. तिच्या वकिलाच्या म्हणण्यानुसार तिने केवळ कायद्यानुसार तिला उपलब्ध असलेल्या कायदेशीर मार्गांचा अवलंब केला. तिने असा आरोप

केला आहे की तिचे 'स्त्रीधन' असलेले दागिने काढून घेण्यात आले आणि ते कधीही परत केले गेले नाहीत आणि त्यामुळे दंड संहिता, १८६० (आय. पी. सी.)(IPC) च्या कलम ४९८ ए (A) आणि ४०६ अंतर्गत तिच्या पतीविरुद्ध तिला गुन्हा दाखल करण्यास  भाग पाडले गेले. तिने सलोख्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले होते, परंतु अपीलकर्त्याच्या असहकारामुळे मध्यस्थी आणि तडजोडीसाठीचे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले, असेही तिचे म्हणणे होते. तिने गर्भपात केल्याचे तिने नाकारले आहे.

५. कौटुंबिक न्यायालयाने १५.१०.२००३ रोजी क्रूरता आणि अभित्यजनाचे वादप्रश्न निश्चित केले. न्यायचौकशी न्यायालयाने पतीच्या बाजूने क्रूरता तसेच परित्यागाबाबतचे निष्कर्ष दिले आणि विवाह विच्छेदित करण्याचा आदेश दिला.

६.  उच्च न्यायालयाने अपीलमध्ये असा निष्कर्ष काढला की उत्तरवादी तिच्या पतीला दिनांक २९.११.१९९८ रोजी त्याच्या घरात प्रवेश करू दिला नाही फक्त  ही वस्तुस्थिती हे सिद्ध करण्यास  पुरेशी नाही की सहवास कायमस्वरूपी संपुष्टात आणण्याचा तिचा हेतू होता आणि म्हणून अभित्यजन हा विवाह विच्छेद करण्याचा आधार होऊ शकत नाही. आय. पी. सी. (IPC) च्या कलम ३२३,३२४, आणि ४९८ ए(A ) अंतर्गत विविध तक्रारी दाखल करण्याबाबत उच्च न्यायालयाचे मत असे होते की केवळ अशा तक्रारी दाखल करणे किंवा परिणामतः दोषमुक्तत करणे हा क्रूरता ठरेल असे नाही, कारण पत्नी केवळ कायद्यानुसार तिला उपलब्ध असलेल्या पर्यायांचा वापर करत होती. शिवाय, कोणत्या परिस्थितीत या तक्रारी दाखल करण्यात आल्या हे देखील पाहावे लागेल.

७.	आम्ही श्री. एस. के. रूंगटा, अपीलकर्ता/पतीचे विद्वान वरिष्ठ वकील आणि श्री. एस. के. भल्ला, प्रतिवादी/पत्नीचे विद्वान वकील यांचे म्हणणे दीर्घकाळ ऐकले आहे आणि अभिलेखावरील दाखल पुराव्यांचा अभ्यास केला.

८.	हे प्रकरण कौटुंबिक न्यायालयापासून उच्च न्यायालयापर्यंत आणि आता शेवटी या न्यायालयात आले आहे. दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय ०८.०४.२०११ चा आहे, जो बारा वर्ष जुना आहे. आतापर्यंत आपल्यासमोर जी सर्व तथ्ये आहेत ती आपण विचारात घेतली पाहिजेत. आमच्या मते जी तथ्ये आपण विचारात घेतली पाहिजेत ती खालीलप्रमाणे आहेतः (१) 'जोडपे' आता जवळजवळ २५ वर्षांपासून वेगळे राहत आहेत आणि या सर्व वर्षांत त्यांच्यात सहवास राहिलेला नाही. (२) विवाह संबंधातून मूलबाळ झाले नाही आणि जोडपे केवळ ४ वर्षे पती-पत्नी म्हणून एकत्र राहिले. (३) न्यायालयांनी समेट किंवा तडजोडीसाठी वारंवार केलेले प्रयत्न अयशस्वी ठरले आहेत.

९.	अगदी सुरुवातीच्या टप्प्यापासून न्यायचौकशी न्यायालयने पक्षकारांना मध्यस्थीसाठी पाठवले होते, जे यशस्वी झाले नाही. या न्यायालयाने दोघांनाही मध्यस्थीसाठी पाठवले होते, जे अयशस्वी झाले. हे प्रकरण पुन्हा लोकअदालतीमध्ये तडजोडीसाठी पाठवण्यात आले परंतु त्याचा कोणताही परिणाम झाला नाही. दिनांक ११.०४.२०१५ रोजी, या न्यायालयाने पुन्हा पक्षकारांना एकत्र राहण्याच्या शक्यता शोधण्याची विनंती केली, परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही. त्यानंतर दिनांक ०९.५.२०१५ रोजी, या न्यायालयाने पक्षकारांनाकाही परस्पर तडजोडीवर येण्यास सांगितले, परंतु ते व्यर्थ ठरले. दुसऱ्या शब्दांत, तडजोड किंवा समेट घडूवून आणण्यासाठी न्यायालय आणि मध्यस्थांचा प्रत्येक प्रयत्न निष्फळ ठरला. आजही पक्षकारांची औपचारिक सुनावणी करण्यापूर्वी आम्ही पक्षकारांकडून सध्याची परिस्थिती

जाणून घेण्याचा प्रयत्न केला. अपीलकर्त्याने स्पष्टपणे सांगितले की कोणत्याही तडजोडीला किंवा समेटाला वाव नाही आणि ते या प्रकरणात गुणवत्तेनुसार निर्णय घेण्याची विनंती करतात, तर उत्तरवादीच्या  वकिलाने या न्यायालयाला सांगितले की उत्तरवादीला  तिचे लग्न वाचवायचे आहे आणि  त्या पुन्हा एकदा मध्यस्थीसाठी प्रार्थना करतात. ते असेही म्हणतात की घटस्फोटासाठी कोणताही आधार तयार करण्यात आलेला नाही आणि दिल्ली उच्च न्यायालयाचा सुविचारित निर्णय कायम ठेवला जावा.

१०. आमच्यासमोर असलेले पती-पत्नी गेल्या २५ वर्षांपासून वेगळे राहत आहेत. त्यांना विवाह संबंधातून मूलबाळ झालेले नाही. गेल्या २५ वर्षांहून अधिक काळापासून दोन्ही बाजूंकडून क्रूरता आणि अभित्यजनचे कटू आरोप आहेत आणि दोघांमध्ये अनेक खटले सुरू आहेत. गेल्या २५ वर्षांपासून शांततेचा एकही क्षण न पाहिलेले अपीलकर्ता आणि उत्तरवादी यांच्यातील हे कटु संबंध हे केवळ कागदपात्रांवरचेच  वैवाहिक संबंध आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की हे नाते फार पूर्वीच अपुनः प्राप्य (ज्यात सुधारणा केली जाऊ शकत नाही) असे तुटले आहे.

११. केवळ अपीलकर्ता-पतीविरुद्ध फौजदारी खटले दाखल करणे म्हणजे क्रूरता होणार नाही, असा दृष्टिकोन उच्च न्यायालयाने घेतला आहे. तरीही, उत्तरवादी-पत्नीने अपीलकर्ता-पतीविरुद्ध दाखल केलेल्या फौजदारी खटल्यांची संख्या खूप जास्त आहे, ज्यांची वर चर्चा केली गेली आहे. या सर्व प्रकरणांत अपीलकर्ता-पतीची सुटका किंवा निर्दोष मुक्तता दिल्ली उच्च न्यायालयाच्या निकालाच्या अधिघोषणे पूर्वी नाही, तर निश्चितपणे दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या घोषणेनंतर झाली आहे. याशिवाय, नवीन कोहली विरुद्ध नीलू कोहली[१] या खटल्यातील या न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने असे म्हटले आहे

की वैवाहिक प्रकरणात एका पक्षाकडून दुसऱ्याविरुद्ध वारंवार फौजदारी खटले दाखल करणे म्हणजे क्रूरता ठरेल आणि के. श्रीनिवास राव विरुद्ध डी. ए. दीपा[२] या खटल्यात या न्यायालयाच्या खंडपीठाने याचा पुनरुच्चार केला होता.

१२. दुसरा पैलू ज्याचा आपण विचार केला पाहिजे तो म्हणजे गेल्या २५ वर्षांपासून अपीलकर्ता आणि उत्तरवादी वेगळे राहत आहेत आणि त्यांनी एकत्र वास्तव्य केलेले नाही. पक्षकारांमध्ये सलोख्याला अजिबात वाव नाही. खरे तर या दोघांमध्ये कोणतेही बंधन नाही आणि कायदा आयोगाने आपल्या ७१ व्या अहवालात अशा विवाहाबद्दल म्हटले आहे की, सदर विवाह हा एक असा विवाह आहे जो प्रत्यक्षात तुटला आहे आणि त्याला केवळ कायद्याद्वारे कायदेशीर मान्यता आवश्यक आहे. विधी आयोगाने आपल्या २१७ व्या अहवालात याचा पुनरुच्चार केला आहे.

१३. अशाच परिस्थितीत, या न्यायालयाने आर. श्रीनिवास कुमार विरुद्ध आर. शमिता[३], मुनीश कक्कर विरुद्ध निधी कक्कर[४] आणि नेहा त्यागी विरुद्ध लेफ्टनंट कर्नल दीपक त्यागी[५] या प्रकरणांमध्ये असे म्हटले आहे की अपुनःप्राप्य विवाह म्हणजे असा विवाह आहे जिथे पती-पत्नी बराच काळ वेगळे राहत आहेत आणि ते पुन्हा एकत्र राहण्याची कोणतीही शक्यता नाही. वरील सर्व तीन प्रकरणांमध्ये, या न्यायालयाने भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १४२ अंतर्गत आपल्या अधिकाराचा वापर करून अपुनःप्राप्य विघटन हा आधार मानून या आधारावर विवाहविच्छेद केला आहे, जो अन्यथा हिंदू विवाह कायद्यांतर्गत अस्तित्वात नाही.

१४.  नवीन कोहली (उपरोल्लेखित ) मध्ये, या न्यायालयाने हिंदू विवाह कायद्यांतर्गत घटस्फोटासाठी आधार म्हणून  विवाहाचे अपुनःप्राप्य विघटन हा आधार जोडण्याचा विचार करण्यासाठी भारतीय संघराज्याला एक प्रबळ शिफारस केली आहे.

१५.  त्यांच्यात अनेक न्यायालयीन लढाया आणि मध्यस्थी आणि तडजोडीतील वारंवार अपयश ही किमान या वस्तुस्थितीची साक्ष आहे की आता या जोडप्यामध्ये कोणतेही बंधन टिकत नाही, हा खरोखरच असा एक विवाह आहे जो अपुनःप्राप्यरित्या विघटित  झाला आहे.

१६.  न्यायालयांसमोरील वैवाहिक प्रकरणे एक वेगळे आव्हान उभे करतात, इतर कोणत्याही प्रकरणांपेक्षा अगदी वेगळे, कारण आपण मानवी नातेसंबंधांना त्याच्या सर्व दोष आणि दुर्बलतांसह, त्याच्या भावनांच्या समूहासह हाताळत आहोत. जोडीदाराच्या 'क्रूर' किंवा निंदनीय वर्तनाकडे लक्ष वेधणे प्रत्येक बाबतीत शक्य नाही. नातेसंबंधाचे स्वरूप, पक्षकारांचे एकमेकांप्रती असलेले सामान्य वर्तन किंवा दोघांमधील दीर्घकाळ वेगळे राहणे हे संबंधित घटक आहेत जे न्यायालयाने विचारात घेतले पाहिजेत. समर घोष विरुद्ध जया घोष[६] या प्रकरणात या न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने कायद्याच्या कलम १३ (१ ) (आय. ए.)(ia) अंतर्गत क्रूरता म्हणजे काय हे तपशीलवार हाताळले होते. वरील निर्णयातील एक महत्त्वाचे मार्गदर्शक तत्त्व म्हणजे क्रूरता निश्चित करण्यासाठी न्यायालयाचा दृष्टीकोन. येथे संपूर्ण वैवाहिक नातेसंबंध तपासले जाणे आवश्यक आहे, कारण क्रूरता ही हिंसक कृती किंवा कृत्यांमध्ये असू शकत नाही, परंतु या प्रकरणात हानीकारक निंदा, तक्रारी, आरोप, टोमणे मारणे  इत्यादींमधून शोधावी लागते. न्यायालयाने हाल्सबरीज लॉज ऑफ इंग्लंड (खंड १३, ४ इ.डि.एन. (Edn), परिच्छेद १२६९, पृष्ठ ६०२) मधील वैवाहिक संबंधांमधील क्रौर्याच्या व्याख्येचा आधार  घेतला आहे, जे येथे उद्‌धृत करणे आवश्यक आहे. :

"क्रौर्याच्या सर्व प्रकरणांमध्ये सामान्य नियम असा आहे की संपूर्ण वैवाहिक नातेसंबंधांचा विचार केला पाहिजे आणि जेव्हा क्रौर्यात हिंसक कृत्यांचा समावेश नसतो तर हानीकारक निंदा, तक्रारी, आरोप किंवा टोमणे मारणे यांचा समावेश असतो तेव्हा त्या नियमाला विशेष महत्त्व असते. ज्या प्रकरणांमध्ये हिंसाचाराची कृत्ये पुष्ट्यर्थ दिली जात नाही अशा प्रकरणांमध्ये, विशिष्ट श्रेणीतील कृत्ये किंवा आचरण हिंसा निर्माण करण्याच्या दृष्टीने पाहण्यासाठी तसेच ज्या कृत्यांमध्ये असे स्वरूप किंवा गुणवत्तेचा अभाव आहे जे त्यांना सर्व परिस्थितींमध्ये क्रूरतेसाठी सक्षम किंवा अक्षम करते त्या प्रकरणात न्यायालयीन निर्णयांचा विचार करणे अनिवार्य आहे; कारण क्रौर्याच्या तक्रारीचे मूल्यांकन करताना त्याच्या स्वरूपापेक्षा वर्तनाचा परिणाम हा सर्वोच्च महत्त्वाचा असतो. एक जोडीदार दुसऱ्याविरुद्ध क्रौर्यासाठी दोषी आहे की नाही हा मूलतः वस्तुस्थितीचा प्रश्न आहे आणि पूर्वी ठरवलेल्या प्रकरणांमध्ये जर काही असेल तर त्याचे मूल्य कमी आहे. न्यायालयाने पक्षकारांची शारीरिक आणि मानसिक स्थिती तसेच त्यांची सामाजिक स्थिती लक्षात घेतली पाहिजे आणि एका जोडीदाराच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि वर्तनाचा दुसऱ्या जोडीदाराच्या मनावर काय परिणाम होतो याचा विचार केला पाहिजे, जोडीदारांमधील सर्व घटना आणि भांडणांचा त्या दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे; पुढे, तक्रारदाराच्या सहनशक्तीची क्षमता आणि ती क्षमता दुसऱ्या जोडीदाराला किती प्रमाणात माहित आहे हे लक्षात घेऊन कथित वर्तनाची तपासणी केली पाहिजे. क्रूरतेसाठी दुष्ट हेतू आवश्यक नाही परंतु जिथे तो अस्तित्वात आहे तिथे तो एक महत्त्वाचा घटक आहे."

१७. सध्याच्या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने हे मत मांडले आहे की, केवळ पत्नीकडून फौजदारी खटले दाखल करणे म्हणजे क्रूरता नव्हे, तर ज्या परिस्थितीत खटले दाखल केले गेले ते देखील पाहावे लागेल, हा एक निष्कर्ष आहे ज्याकडे आपण पूर्णपणे दुर्लक्ष करू इच्छित नाही, खरे तर कायद्यातील शुद्ध विधान म्हणून तो योग्य असू शकतो, परंतु आता आपल्यासमोर असलेल्या प्रकरणातील संपूर्ण तथ्यांचे देखील आपण बारकाईने परीक्षण केले पाहिजे. आज अस्तित्वात असलेली तथ्ये जेव्हा आपण विचारात घेतो, तेव्हा आपल्याला खात्री पटते की हा विवाह कायम ठेवणे म्हणजे क्रौर्य चालू ठेवणे, जे आता प्रत्येकजण दुसऱ्यावर लादत आहे. हिंदू विवाह कायद्यानुसार, विवाहाचे अपुनःप्राप्य विघटन हा विवाहविच्छेदचा आधार असू शकत नाही, परंतु क्रूरता हा आहे. घटस्फोटाच्या आदेशाद्वारे विवाहविच्छेद केला जाऊ शकतो जेव्हा इतर गोष्टींबरोबरच, "दुसऱ्या पक्षाने विवाह झाल्यानंतर याचिकाकर्त्याला क्रूरतेने वागवले असेल."[७] आमच्या मते, वर्षानुवर्षे अधिक कडवे आणि कटु झालेले वैवाहिक संबंध, दोन्ही बाजूंवर क्रूरता आणण्याशिवाय काहीही करत नाहीत. या विच्छेदित विवाहाचा आविर्भाव जिवंत ठेवणे म्हणजे दोन्ही पक्षांवर अन्याय करणे ठरेल. अपुनःप्राप्य विघटनाने तुटलेला विवाह, आमच्या मते दोन्ही पक्षांसाठी क्रूरता दर्शवितो, कारण अशा नातेसंबंधात प्रत्येक पक्ष एकमेकांशी क्रूरतेने वागतो. त्यामुळे कायद्याच्या कलम १३(३) (आय. ए.) (ia)अंतर्गत विवाह मोडण्यासाठी हा एक आधार आहे.

१८. या कायद्यांतर्गत क्रौर्याची व्याख्या केलेली नाही. असे असले तरी, ज्या संदर्भात त्याचा वापर केला गेला आहे, जो विवाह मोडण्याचा आधार आहे, त्यावरून असे दिसून येईल की वैवाहिक नातेसंबंधात त्याकडे 'मानवी आचरण' आणि 'वर्तन' म्हणून पाहिले पाहिजे. समर

घोष (उपरोल्लेखित) प्रकरणाची सुनावणी करताना या न्यायालयाने असे मत व्यक्त केले की क्रूरता शारीरिक तसेच मानसिक असू शकते.

> "४६... जर ती शारिरीक असेल तर, वस्तुस्थिती आणि प्रमाणाचा प्रश्न आहे. जर मानसिक असेल तर क्रूर वागणुकीचे स्वरूप आणि त्यानंतर अशा वागणुकीचा जोडीदाराच्या मनावर काय परिणाम होतो याबद्दल चौकशी सुरू झाली पाहिजे. यामुळे दुसऱ्यासोबत राहणे हानिकारक किंवा हानिकारक ठरेल अशी वाजवी भीती निर्माण झाली की नाही, शेवटी, वर्तनाचे स्वरूप आणि तक्रार करणाऱ्या जोडीदारावर त्याचा होणारा परिणाम लक्षात घेऊन निष्कर्ष काढण्याची बाब आहे.

१९. क्रूरता ही अहेतुकदेखील असू शकते:-

...मानवी व्यवहारातील सामान्य अर्थाने तक्रार केलेली कृती ही क्रूरता मानली जाऊ शकते जरी त्या कृतीत हेतूचा अभाव असला तरीही काही फरक पडत नाही. क्रौर्यामध्ये हेतू हा आवश्यक घटक नाही. जाणीवपूर्वक किंवा जाणूनबुजून वाईट वागणूक दिली गेली नाही या आधारावर पक्षकाराला दिलासा नाकारला जाऊ शकत नाही."

२०. या न्यायालयाने मात्र शेवटी मानसिक क्रौर्याची काही उदाहरणे दिली. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे आहेत.

> (i ) पक्षकारांच्या संपूर्ण वैवाहिक जीवनाचा विचार केल्यावर, ज्या तीव्र मानसिक वेदना, व्यथा आणि दुःख ज्यामुळे पक्षकारांना एकमेकांसोबत राहणे शक्य होणार नाही, त्या गोष्टी मानसिक क्रौर्याच्या व्यापक निकषांमध्ये येऊ शकतात.
>
> (xii) कोणतीही शारीरिक असमर्थता किंवा वैध कारण नसताना बराच काळ संभोग करण्यास नकार देण्याचा एकतर्फी निर्णय मानसिक क्रूरता ठरू शकतो.

(xiii) विवाहसंबंधातून मूल न होऊ देण्याचा पती किंवा पत्नी पैकी कोणाचाही एकतर्फी निर्णय हा क्रूरता ठरू शकतो.

**(xiv) जिथे सतत विभक्त राहण्याचा दीर्घ कालावधी असेल, तिथे वैवाहिक संबंध सुधारण्याच्या पलीकडे आहे असा न्याय्य निष्कर्ष काढला जाऊ शकतो. जरी कायदेशीर बंधनाद्वारे मान्यता असली तरी तो विवाह एक काल्पनिक बनतो. ते बंधन तोडण्यास नकार दिल्याने, अशा प्रकरणांमध्ये कायदा, विवाहाचे पावित्र्य साधत नाही; याउलट, हे पक्षकारांच्या भावना आणि भावनांबद्दल कमी आदर दर्शवते. अशा परिस्थितीत, यामुळे मानसिक क्रूरता होऊ शकते.** (तळटीपा खाली उद्धृत केल्या आहेत)

२१. आमच्या समोर एक विवाहित जोडपे आहे जे चार वर्षे क्वचितच जोडपे म्हणून एकत्र राहिले आहेत आणि जे आता गेल्या २५ वर्षांपासून वेगळे राहत आहेत. त्यांना विवाह संबंधातून मूलबाळ झालेले नाही. त्यांच्यातील वैवाहिक बंधन पूर्णपणे तुटले आहे आणि ते सुधारण्याच्या पलीकडे आहे. हे नाते संपुष्टात आलेच पाहिजे यात आम्हाला शंका नाही, कारण ते कायम ठेवणे म्हणजे दोन्ही बाजूंवर क्रूरता करणे होय. दीर्घकाळ वेगळे राहणे आणि सहवास नसणे आणि सर्व अर्थपूर्ण बंधांचे संपूर्ण विघटन आणि दोघांमधील सध्याची कटुता, १९९५ च्या कायद्याच्या कलम १३ (१) (आय. ए.)(ia) अंतर्गत क्रूरता म्हणून वाचली पाहिजे. म्हणून आम्ही असे मानतो की अशा प्रकरणात, जसे की सध्याचे प्रकरण, जेथे वैवाहिक संबंध अपुनःप्राप्य विघटीत झाले आहेत, जेथे पक्षकारांमधील अनेक न्यायालयीन खटल्यांसह दीर्घकाळ वेगळे राहणे आणि सहवास नसणे (सध्याच्या प्रकरणाप्रमाणे गेल्या २५ वर्षांपासून) आहे; तर असा 'विवाह' कायम ठेवणे म्हणजे केवळ क्रूरतेस मंजुरी देणे होय जे एकजण दुसऱ्यावर लादत आहे. या विवाहाच्या विघटनाचा परिणाम केवळ दोन पक्षांकारांवरच होईल,

या वस्तुस्थितीची आम्हाला जाणीव आहे, कारण विवाह संबंधातून कोणतेही मूल झालेले नाही.

२२. या परिस्थितीत, आमच्या आदेशात दिलेल्या वेगवेगळ्या आधारांवर आम्ही न्यायचौकशी न्यायालयाचा आदेश कायम ठेवतो आणि उच्च न्यायालयाचा आदेश रद्द करतो आणि अपीलकर्ता/पतीला घटस्फोटाचा हुकूम देतो. त्यांचा विवाह विघटित केला जाईल.

२३. तथापि, अपीलकर्ता/पती हा जीवन विमा महामंडळातील कर्मचारी आहे ही बाब लक्षात घेता, जे आम्हाला न्यायालयात कळवण्यात आले आहे आणि त्याचा सध्याचा पगार रु. १,००,०००-(एक लाख रुपये) दरमहा आहे, त्यामुळे आम्ही हे योग्य व उचित मानतो की तो रु. ३०,००,०००/-(तीस लाख रुपये) उत्तरवादीला/पत्नीला कायमस्वरूपी पोटगी म्हणून देईल. ही रक्कम रु. ३०,००,०००/-(तीस लाख रुपये) आजपासून चार आठवड्यांच्या कालावधीत या न्यायालयाच्या निबंधक कार्यालयात उतरवादीच्या नावे जमा केली जाईल. सदर जमा केलेल्या रकमेच्या तारखेपासूनच घटस्फोटाचा हुकूम लागू केला जाईल. सदर रक्कम जमा केल्यावर निबंधक कार्यालय उत्तरवादी/पत्नीच्या ओळखपत्रांची पडताळणी केल्यानंतर या न्यायालयाला पुढील रेफरन्स (संदर्भ) न देता उत्तरवादी/पत्नीला रक्कम वितरित करतील.

२४. उपरोक्त निर्देशांसह, अपील मंजूर केली आहे.

----------

[१](२००६) ४ (एस सी सी ) SCC ५५८

[२](२०१३) ५(एस सी सी ) SCC २२६

[३](२०१९) ९ (एस सी सी ) SCC ४०९

[४](२०२०) १४ (एस सी सी ) SCC ६५७

[५](२०२२) ३ (एस सी सी ) SCC ८६

[६](२००७) ४ (एस सी सी ) SCC ५११

[७]हिंदू विवाह अधिनियम, १९५५ च्या कलम १३ (१)(आय ए) (ia)

-------------

**<u>अस्वीकरण</u>**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबाजवणीकरीता वैध मानला जाईल."